


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकाचे सुशोभीकरण आता अंतिम टप्प्यामध्ये

Volume IV Issue 9 Date 13-05-2024

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकाचे सुशोभीकरण आता अंतिम टप्प्यामध्ये

सोलापूर शहराचे प्रवेशद्वार असलेले धर्मवीर संभाजी महाराज चौकाला नवा लुक मिळाला आहे जिल्हा नियोजन समितीकडून पुतळ्याच्या बुरुजाचे काम पूर्ण झाल्यानंतर आता महापालिकेच्या वतीने तब्बल एक कोटी ५९ लाख रुपये खर्च करून पुतळा परिसरातील सुशोभीकरणाचे काम हाती घेतले आहेत. 90% काम पूर्ण झाले असून मे महिन्याचा अखेरीस हे काम पूर्ण होणार आहे.

परिसराचे असे झाले सुशोभीकरण 15 बुरुजावर 14 मावळे बसवण्यात आले आहेत , कोरीव दगड बांधकाम करून दोन्ही बाजूस असलेल्या लॉन मध्ये सुशोभीकरणाची झाडे,थ्रीडी लाइटिंग, बसण्यासाठी बाकडांची सोय केलेली आहे रंगबिरंगी कारंजा उभा केलेले आहेत. एकूणच नवीन सुशोभीकरणाच्या कामामुळे धर्मवीर संभाजी महाराज चौक सोलापूर शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे.

